विमा संचालनालयाच्या आस्थापनेवर शिपाई (गट-ड) संवर्गातील काल्पनिक पदे निर्माण करुन ती कंत्राटी तत्वाने भरण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय, क्रमांक: आस्थाप-२०१८/प्र.क्र.८३/विमा प्रशासन
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक:- ०७ मार्च, २०१९

संदर्भ:-

१) वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र.पदनि-२०१३/प्र.क्र.११२/१३/वित्तीय सुधारणा-१, दि.०२.१२.२०१३
२) वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.२९/१६/वित्तीय सुधारणा-१ , दि.०२.०८.२०१६
३) वित्त विभाग,शासन निर्णय क्र.आस्थाप-२०१७/प्र.क्र.९६/विमा प्रशासन, दि.३१.१.२०१८

प्रस्तावना:-

वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विमा संचालनालय या कार्यालयाच्या आस्थापनेवरील शिपाई (गट-ड) ची रिक्त ३ पदे आणि नजिकच्या काळात रिक्त होणारे १ पद अशी एकूण ४ पदे, नियमित नियुक्तीने भरण्यात येईपर्यंत, कंत्राटी तत्वाने भरण्याबाबतची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

वित्त विभाग, शासन निर्णय, दि.०९.०६.२०१७ अन्वये गठीत अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, आणि सचिव (व्यय) यांच्या उप समितीने दि.०८.०१.२०१९ रोजी मान्यता दिल्यानुसार विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवर शिपाई (गट-ड) संवर्गातील रिक्त असलेल्या ४ पदांऐवजी शिपाई (गट-ड) ची ४ काल्पनिक पदे निर्माण करुन सदर पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर पदे बाह्ययंत्रणेद्वारे भरताना शासन परिपत्रक क्र.पदनि-२०१३/प्र.क्र.११२/१३/ वित्तीय सुधारणा-१, दि.०२.१२.२०१३ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी विमा संचालकांची राहील.

३. हा शासन निर्णय वित्त विभाग आकृतीबंध पुनर्रचना कक्ष कार्यासनाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.६२७/२०१८ च्या अनुषंगाने पृष्ठांकन क्र.पदनि-२०१९/प्र.क्र.०३/आपुक, दि.०८.०१.२०१९ सोबत प्राप्त झालेल्या इतिवृत्तानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashatra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०३०८१२४०४७२६०५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Shubhangi Rajan Sheth

Digitally signed by Shubhangi Rajan Sheth
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ed6787d4f25b2cc00214a10047a10d4fa848c8d19fb8dda27b4525e3ace2c767, cn=Shubhangi Rajan Sheth
Date: 2019.03.08 12:43:27 +05'30'

(शुभांगी शेठ)

सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१ महाराष्ट्र ,मुंबई.
२. महालेखापाल (लेखा परीक्षा)-२ महाराष्ट्र, नागपूर.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र, नागपूर.
५. महालेखापाल, स्थानिक निधी, लेखा संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई.
६. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखापरीक्षा अधिकारी,मुंबई.
८. संचालक,विमा संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मंबई-५१.
९. संचालक, लेखा व कोषागारे,महाराष्ट्र, मुंबई.
१०.संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११.मा.मुख्य सचिव, यांचे स्वीय सहायक.
१२.अ.मु.स.(वित्त) यांचे स्वीय सहायक.
१३.प्र.स.(ले.व को.) यांचे स्वीय सहायक.
१४.प्र.स.(वि.सू.) यांचे स्वीय सहायक.
१५.सचिव (व्यय) यांचे स्वीय सहायक.
१६.कक्ष अधिकारी, (आ.पु.क./व्यय-२) वित्त विभाग.
१७.निवडनस्ती/विमा प्रशासन.